# मुंबई मेट्रो-३ च्या कामाला ऑक्टोबरपासून सुरुवात

## पहिला टप्पा २०२०ला पूर्ण होणार

**मुंबई :** मुंबईच्या सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेत महत्त्वाचा ठरणाऱ्या, सुमारे १८ हजार कोटी रुपये खर्चाच्या आणि ३३.५ किमी लांबीच्या कुलाबा- वांद्रे-सीप्झ मेट्रो-३ प्रकल्पाच्या उभारणीचे काम एल ॲण्ड टी, एचएससी यासारख्या पाच नामांकित कंपन्यांना मिळाले आहे. येत्या ऑक्टोबरमध्ये मेट्रो उभारणीच्या कामास सुरुवात होणार असून सन २०२०मध्ये सीप्झ ते वांद्रेदरम्यान मेट्रो धावेल अशी माहिती मुंबई मेट्रो रेल कार्पोरेशनचे प्रकल्प संचालक एस. के. गुप्ता यांनी दिली.

कुलाबा- वांद्रे-सीप्झ मेट्रो-३ प्रकल्पासाठी आतापर्यंत ८३ टक्के भूसंपादन पूर्ण झाले असले तरी कारशेडच्या जागेचा वाद मात्र अजून मिटलेला नाही. सात टप्प्यात हे काम करण्यात येणार असून आंतरराष्ट्रीय निविदा प्रक्रियेतून पात्र ठरलेल्या पाच कंपन्यांना आज ही कामे देण्यात आली. कफ परेड ते छत्रपती शिवाजी



टर्मिनसपर्यंतचे पहिल्या टप्प्याचे काम एल ॲण्ड टी- एसटीईसी कंपनीला देण्यात आले असून त्यांची किंमत २१४४ कोटी आहे. या टप्प्यात कफ परेड, विधान भवन, चर्चगेट हुतात्मा चौक या स्थानकांचा समावेश आहे. दुसऱ्या टप्प्यातील छत्रपती शिवाजी टर्मिनस ते मुंबई सेंट्रलदरम्यानचे २११५ कोटींचे कंत्राट एचएससी-एमएमएस या कंपन्यांना देण्यात आले आहे. सीएसटी मेट्रो, काळबादेवी, गिरगाव, ग्रॅन्ट रोड या स्थानकांचा त्यात समावेश आहे. तिसऱ्या टप्प्यात मुंबई सेंट्रल ते वरळीदरम्यानचे २४२२ कोटींचे काम डोगस-सोमा कंपन्यांना देण्यात आले आहे.